# परिचारीका पदभरती प्रक्रिया - 2023 च्या तक्रारी, आक्षेप व हरकतींबाबतचे स्पष्टीकरण/अभिप्राय

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत परिचारीका (Staff Nurse) पदभरती प्रक्रिया - 2023 अंतर्गत तात्पुरत्या गुणवत्ता यादीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप व हरकतींबाबत मा.उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य) यांच्या मंजूरी क्र.उप आयुक्त/सा.आ./3025 दि.03.01.2024 अन्वये या कार्यालयाचे स्पष्टीकरण/अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत परिचारीका (Staff Nurse) भरती प्रक्रिया - 2023 या संवर्गातील 652 रिक्त पदे भरण्याच्या प्रस्तावास मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र.एमजीसी/एफ/8971 दि.21.02.2023 अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने दि.12.07.2023 रोजी परिचारीका (Staff Nurse) पदाची तात्पुरती गुणवत्ता यादी http://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेली होती. सदर तात्पुरती गुणवत्ता यादी उमेदवारांची मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे फेर पडताळणी सापेक्ष व निवडीच्या निकषांची पूर्तता यांच्या अधिन राहून तयार करण्यात आलेली होती. तसेच, सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी ही विहित शासन निर्णय, शासन परिपत्रके तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके व जाहिरातीतील नमूद रिक्त पदे, निवडीचे निकष, अटी व शर्ती नुसार तयार करण्यात आलेली आहे.

सही /-
डॉ. दक्षा शाह
कार्यकारी आरोग्य अधिकारी